RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४४

दि. ०५ जून २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक


# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


## माजी कॅबिनेट मंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचं निधन, काँग्रेस विचारांचा एकनिष्ठ खांब निखळला

**पुणे/प्रतिनिधी** :भोर-वेल्हा मतदार संघाचे माजी आमदार आणि राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे गुरुवारी पुण्यात निधन झाले. वयाच्या ९३ व्या वर्षी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाल्याची माहिती समोर आली असून त्यांच्या निधनामुळे पुणे जिल्हा तसेच राज्याच्या राजकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



भोर-वेल्हा विधानसभा मतदारसंघाचे अनेक वर्षे प्रतिनिधित्व करणारे अनंतराव थोपटे हे ग्रामीण विकासाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. शेतकरी प्रश्न, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधा यांसारख्या मूलभूत विषयांवर त्यांनी सातत्याने काम केले. भोर तालुक्याच्या सर्वांगीण विकासात त्यांचे मोठे योगदान मानले जाते. जनतेशी असलेला थेट संपर्क आणि कार्यकर्त्यांशी असलेला जिव्हाळा ही त्यांच्या राजकीय कारकिर्दीची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

राज्याच्या राजकारणातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असून महाराष्ट्र मंत्रिमंडळात त्यांनी अनेक वर्षे कॅबिनेट मंत्री म्हणून काम केले. तसेच पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. प्रशासन आणि विकासकामांचा समन्वय साधणारे अनुभवी नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली होती.

१९९९ मध्ये राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये बदल झाल्यानंतर काँग्रेस पक्षासमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. त्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदाची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे सांभाळली आणि पक्ष संघटना मजबूत ठेवण्यासाठी तसेच कार्यकर्त्यांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# विधानपरिषद निवडणूक २०२६ : ५ जागा बिनविरोध

## उमेदवारांनी वेळेवर अर्ज मागे घेतल्याने महाविकास आघाडीला धक्का

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुकीच्या प्रक्रियेची रणधुमाळी सध्या सुरू आहे. आज अर्ज मागं घेण्याचा शेवटचा दिवस असल्यानं राज्यभरात मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. उबाठाच्या काही उमेदवारांनी वेळेवर अर्ज मागं घेतल्यानं महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. दुसरीकडं कोकण विभागाचे उमेदवार बाळ माने यांना भाजपा नेते तथा मंत्री नितेश राणे हे थेट जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज मागं घेण्यासाठी घेऊन आले. त्यामुळे मोठी चर्चा रंगली. छत्रपती संभाजीनगरमध्ये देवयानी कृष्णा डोणगावकर यांनी आपला अर्ज मागं घेतल्यानं अपक्ष उमेदवारावर महाविकास आघाडीची भिस्त आहे.

विधानपरिषदेच्या ५ जागा बिनविरोध : पुणे विधानपरिषद निवडणूक २०२६ मधून आज राष्ट्रवादी सुनील टिंगरे, भाजपा बंडखोर प्रदीप कंद यांनी माघार घेतली. दुसरीकडं महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीकांत पाटील यांनी माघार घेतल्यानं विक्रम काकडे बिनविरोध विजयी झाले. छत्रपती संभाजीनगरात महाविकास आघाडीच्या देवयानी डोणगावकर यांनी



ऐन वेळेवर आपली उमेदवारी मागं घेतल्यानं मोठी खळबळ उडाली. त्यामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. त्यानंतर लगेच उबाठा खासदार संजय राऊत यांनी देवयानी डोणगावकर यांची पक्षातून हकालपट्टी केल्याची घोषणा केली. ऐनवेळी निर्माण झालेल्या अडचणीनंतर गणेश लोखंडे हे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याची घोषणा करण्यात आली. ''वैयक्तिक कारणांनी आपण माघार घेत असल्याचं देवयानी डोणगावकर यांनी सांगितलं. तर त्यांचे पती कृष्णा पाटील डोणगावकर यांनी, ''बिनविरोध निवडणूक होऊ नयेत म्हणून आमचे दोन उमेदवार होते. पण निवडणूक खर्चिक होती, लढण्यात काही फायदा नव्हता. शिवसेनेकडं मदत मिळणार नसल्यानं माघार घेतली,'' असं त्यांनी स्पष्ट केलं.

**बिनविरोध विजयी उमेदवार :**

१) वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर : अरुण लखाणी, भाजपा

२) पुणे: विक्रम ाकडे , राष्ट्रवादी काँग्रेस

३) ठाणे :रवींद्र फाटक , शिवसेना

४) रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग : अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस

५) यवतमाळ : दुष्यंत चतुर्वेदी, शिवसेना

**विधानपरिषद निवडणूकीचा संपूर्ण कार्यक्रम**

निवडणुकीची अधिसूचना- २५ मे

अर्ज भरण्याची शेवटची तारीख- १ जून

उमेदवारी अर्जांची छाननी- २ जून

अर्ज माघारीची मुदत- ४ जून

मतदान- १८ जून (स.८ ते दु.४)

मतमोजणी- २२ जून

**राज्यातील १२ मतदारसंघातील प्रमुख लढती, आमन-सामने कोण?**

१. सोलापूर : राजेंद्र राऊत (भाजपा) विरुद्ध वसंतराव देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार)

२. अहिल्यानगर -प्राजक्त तनपुरे (भाजपा) विरुद्ध दत्तात्रय पानसरे (अपक्ष)

३. जळगाव : नंदकिशोर महाजन (भाजपा) विरुद्ध शरद तायडे (उबाठा) विरुद्ध रेश्मा काळे (शिवसेना बंडखोर)

४. सांगली-सातारा : धैर्यशील कदम (भाजपा) विरुद्ध अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार ) विरुद्ध किशोर धुमाळ (अपक्ष)

५. नांदेड : अमर राजूरकर (भाजपा) विरुद्ध रामदास पाटील (काँग्रेस)

६. भंडारा-गोंदिया : नरेश ईश्वरकर (काँग्रेस पाठिंबा) विरुद्ध अविनाश ब्राह्मणकर (भाजपा)

७. नाशिक : गोकुळ गीते (अपक्ष) विरुद्ध नरेंद्र दराडे (शिवसेना)

८. अमरावती : हर्षदीप देशमुख (काँग्रेस) विरुद्ध प्रवीण पोटे (भाजपा) विरुद्ध निलेश विश्वकर्मा (वंचित )

९. धाराशिव-लातूर-बीड : बसवराज पाटील (भाजपा) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)

१०.परभणी-हिंगोली : सईद खान (शिवसेना) विरुद्ध डॉ. विवेक नावंदर (उबाठा) विरुद्ध सुशील देशमुख (अपक्ष)

११. छत्रपती संभाजीनगर-जालना : सुहास शिरसाट (भाजपा) विरुद्ध गणेश लोखंडे (ठाकरेंची शिवसेना)

१२. नागपूर (पोटनिवडणूक) : डॉ. राजीव पोतदार (भाजपा) विरुद्ध अतुल लोंढे (काँग्रेस)

## खाणकाम प्रकल्पाप्रकरणी श्रीनिवास रेड्डी यांना निलंबित करा, आदित्य ठाकरेंची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी** : ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि इंद्रावती व्याघ्र प्रकल्पाला जोडणाऱ्या मार्गिकेत खाणकामास राज्य सरकारकडून परवानगी देण्यात आली आहे. याप्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे आक्रमक झाले आहेत. यासंदर्भात गुरूवारी (४ जून) आदित्य ठाकरे यांनी दादरमधील शिवसेना भवनात पत्रकार परिषद घेतली. यावेळी ताडोबा आणि इंद्रावती वाघ्र प्रकल्पांना जोडणाऱ्या मार्गिकेत खाणकामास त्यांनी विरोध केला. २८ एप्रिल २०२६ रोजी प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास रेड्डी यांनी संबंधित जमीन खाण कामासाठी देण्याबाबत विचारणा केली होती. याचबरोबर, हा परिसर टायगर कॉरिडोर असल्याचं नमूद केलं होतं. मात्र १३ मे २०२६ रोजी त्यांनीच दिलेल्या पत्रात हा भाग टायगर कॉरिडोर नसल्याचं नमूद केलं. अवघ्या एका महिन्यात दोन परस्पर विरोधी भूमिका कशा घेण्यात आल्या? असा सवाल यावेळी आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

याचबरोबर, महिनाभरात झालेल्या भूमिकांच्या या बदलामागे कोणाचा दबाव आहे का? याची चौकशी होणं आवश्यक असल्याचं आदित्य ठाकरे यांनी सांगितलं. तसंच आता शहरांनंतर जंगल देखील कंत्राटदारांच्या घशात घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. याशिवाय, केंद्रीय वनमंत्री भूपेंद्र यादव यांना पत्र लिहून श्रीनिवास रेड्डी यांना निलंबित करण्याची मागणी देखील केल्याचं आदित्य ठाकरे यांनी सांगितलं.

## महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेत राजकुमार बडोले यांची नियुक्ती

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूरच्या कार्यकारी परिषदेच्या सदस्यपदी माजी मंत्री तथा ज्येष्ठ समाजनेते राजकुमार बडोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशासकीय कार्याला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विद्यापीठाच्या सर्वोच्च निर्णयप्रक्रियेतील महत्त्वाची यंत्रणा म्हणून कार्यकारी परिषद ओळखली जाते.



विद्यापीठातील शिक्षण व्यवस्था बळकट करणे, संशोधनाला चालना देणे, विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांपर्यंत आधुनिक ज्ञान पोहोचविणे, अभ्यासक्रमांचे अद्ययावतीकरण, पायाभूत सुविधांचा विकास तसेच पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यविज्ञानाशी संबंधित विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यकारी परिषद महत्त्वाची भूमिका बजावते. राजकुमार बडोले यांना सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ अनुभव असून सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा लाभ विद्यापीठाला होणार आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास विविध स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत करत अभिनंदन केले आहे. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार , राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल, सुनील तटकरे यांच्यासह नियुक्त आमदार डॉ परिणय फुके, चैनसुख संचेती आणि संजय मेश्राम यांनी राजकुमार बडोले यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या अनुभवाचा आणि नेतृत्वाचा लाभ विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन व विकासात्मक उपक्रमांना होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

## ६ व ७ जूनला रंगणार बालरंगभूमी क्रिकेट लीगचा थरार; ऐरोलीत रंगणार राज्यस्तरीय सामने

**लातूर/प्रतिनिधी :** क्रिकेट हा केवळ खेळ नसून तो संघभावना आणि समन्वय वाढविणारा एक उत्तम माध्यम आहे. लहान बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि बालरंगभूमीच्या चळवळीला गती देण्यासाठी सातत्याने कार्यरत असणाऱ्या बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांमध्ये संघटनकौशल्य वाढावे, तसेच त्यांच्या शारीरिक आरोग्याला चालना मिळावी, या उद्देशाने एका अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के-सामंत यांच्या संकल्पनेतून येत्या दिनांक ६ व ७ जून २०२६ रोजी बालरंगभूमी क्रिकेट लीग चा थरार रंगणार आहे.

दिनांक ६ व ७ जून असे दोन दिवस ऐरोली (नवी मुंबई) येथील युरो इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर ही भव्य क्रिकेट लीग खेळवली जाणार आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून रत्नागिरी, जळगाव, पुणे, नंदुरबार, लातूर, परभणी, सांगली, इचलकरंजी, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, धुळे, अहिल्यानगर, ठाणे







आणि कल्याण येथील बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांचे अधिकृत संघ ताकदीने सहभागी होणार आहेत. सोशल मीडियावर रंगणार लाइव्ह प्रक्षेपण

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मैदानावर रंगणाऱ्या या अटीतटीच्या सामन्यांचे फेसबुक, इन्स्टाग्राम आणि युट्यूब या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. यामुळे राज्यभरातील रंगकर्मी आणि क्रीडाप्रेमींना या सामन्यांचा घरबसल्या आनंद घेता येणार आहे.

या लीगमध्ये लातूर शहरातून सहभागी होणाऱ्या संघात राहुल गायकवाड (कर्णधार), रणजित आचार्य (उप कर्णधार), मयुर राजापूरे, शुभम सालमे, शैलेश तिवारी, पंकज सुरवसे, मुन्ना कोरे, आकाश माने, राम रेड्डी, गणेश स्वामी, आकाश बाभळे, विशाल वाटवडे, कृष्णा खानापुरे, नितीन पुट्टेवाड बालरंगभूमीचे प्रमुख पदाधिकारी व सक्रिय रंगकर्मी खेळाडू म्हणून मैदानात उतरणार आहेत.

बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित या अनोख्या क्रीडा महोत्सवाचा सर्व बालप्रेक्षक, नाट्यप्रेमी आणि पालकांनी प्रत्यक्ष व ऑनलाईन माध्यमांतून आस्वाद घ्यावा आणि खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या मध्यवर्तीतर्फे करण्यात आले आहे.




## संपादकीय...

### शेतकरी, महागाई अन् विरोधाभासी राजकारण

देशात महागाईची व्याख्याच विचित्र झाली आहे. २०१४ मध्ये ६०-६५ रुपये असलेले पेट्रोल शंभरी ओलांडून गेले, तरी शांतता असते; पण कांदा १० रुपये महाग झाला की, देशभर हाहाकार माजतो. बाजारात डाळ दोन रुपये किलोने महाग झाली, खाद्यतेल १०-१५ रुपयांनी वाढले की दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात मथळा असतो- महागाईने जनता होरपळली! कांद्याचे भाव ४०-५० रुपये झाले की 'कांद्याने आणले डोळ्यात पाणी.' दुधाचे दर ५-१० रुपये लिटरमागे वाढले की, 'आता गरिबाचा चहा झाला महाग' अशी कार्टून येतात. टीव्हीवर चर्चा झडतात. सरकारे स्पष्टीकरणे देतात. विरोधक आंदोलन करतात. कधी सरकारे कोसळतातसुद्धा. पण पेट्रोल ६० रुपयांवरून ११५ रुपयांवर गेले तेव्हा हीच अस्वस्थता कुठे होती? घरगुती गॅस ४०० रुपयांवरून ११०० रुपयांच्या आसपास पोहोचला तेव्हा महागाईची आग कुणाला जाणवली नाही का? सिमेंट, लोखंड, बांधकाम साहित्य, पाईप, शिक्षण, आरोग्य सेवा, मोबाईल डेटा, दुचाकी, चारचाकी वाहनांचे दर, घरांचे दर, प्लॉटचे दर, सोन्या-चांदीचे भाव, हॉटेलमधील खाद्यपदार्थ, कपडे, रेल्वे-बस तिकीट, मजुरी, रासायनिक खते, बियाणे यांनी गेल्या काही वर्षांत विक्रमी झेप घेतली. प्रामुख्याने २०२० च्या कोरोना काळानंतर, पण त्या काळात वर उल्लेख केलेल्या वस्तूच्या भाववाढीच्या नावाने देशभर गदारोळ झाला नाही. मग महागाई म्हणजे नेमके काय? शेतकऱ्याच्या मालाचे, खाण्या-पिण्याच्या वस्तूचे भाव वाढले तरच महागाई आणि बाकी कुठल्याही वस्तू महाग झाल्या तर ती अर्थव्यवस्थेची गरज... ही दुटप्पी नीती आहे! १९६७ साली सोन्याचा भाव होता १०२ रुपये १२ ग्रॅमला; तर कापसाला भाव होता १८० रुपये प्रति क्विंटल आणि गव्हाला, धानाला भाव होता ९० रुपये क्विंटल. शिक्षकाला पगार होता ४० रु प्रतिमहिना, मात्र तुलनेत आज ६० वर्षांनंतर शेतमालाच्या आधारभूत किमती म्हणजे गहू, धान २५०० रु. आणि कापूस ८००० रु. प्रतिक्विंटल इतक्या न्यूनतम पातळीवर आहेत. तुलना केल्यास असे दिसेल की, शेतमालाच्या किमती २० ते २५ पट वाढल्यात तर इतर सर्व किमती, शासकीय नोकरांचे, आमदार, खासदार ह्यांचे पगार, भत्ते हे १००० ते १५०० पटींनी वाढलेत आणि वरून सोयी- सवलती वेगळ्याच. जर सोन्याचे भाव १५०० पट वाढून १ लाख ६० हजार होणे विकास असेल तर गहू, तांदूळ, इतर धान्य आणि कापसाचे भाव २० ते २५ पट वाढणे महागाई कशी ठरते? त्या काळात शेतीला लागणारे बियाणे, खते घरीच होती आणि मजुरी धान्यात द्यावी लागायची. म्हणजे बाहेरून काही आणावेच लागत नव्हते. आज शेतीला सरकारी धोरण आणि हरितक्रांतीमुळे सर्व बाहेरून विकत घ्यावे लागते, ज्याच्या किमती दरवर्षी अव्वाच्या सव्वा वाढत आहेत. आणि सरकार मात्र हमी भावात (की कमी भावात) गहू आणि धान खरेदी करून तो ८० कोटी लोकांना फुकट वाटते. त्यातील निम्मा गहू आणि तांदूळ मग पुन्हा बाजारात १० ते १२ रुपयांत विकला जातो. अशा प्रकारे शेतकऱ्यांचे १०० ते १२५ कोटी ग्राहक सरकार काढून घेते. मग शेतकऱ्यांनी गहू, तांदूळ विकावा कुणाला? डाळी, तेल सरकार स्वस्तात आयात करते. मग ते उत्पादन शेतकऱ्यांनी घ्यावे कशाला आणि कुणासाठी? सरकार शेतकऱ्याकडून धान्य स्वस्तात खरेदी करते, ते मोफत वाटते आणि त्याच वेळी औद्योगिक वस्तू मात्र सरकार ना कमी भावात विकत घेते, ना कुणाला फुकट देते! उद्योगपतींचा माल बाजारभावाने विकला जातो. देशातच नव्हे तर जगात अशी दुसरी कोणती उद्योगव्यवस्था आहे, जिचे ग्राहक सरकार स्वतः काढून घेते? शेतीला लागणाऱ्या सर्वच वस्तू मात्र शेतकऱ्यांना भरमसाट किमतीमध्ये विकत घ्याव्या लागतात! ही कुठली नीती? देशातील सर्वच घटकांना त्यांच्या मालाचा आणि सेवांचा वाढीव मोबदला चालतो. उद्योगपतीला चालतो. बिल्डरला चालतो. डॉक्टरला चालतो. शाळांना चालतो. मोबाईल, पेट्रोलियम कंपन्यांना चालतो. सरकारला कर वाढवून महसूल वाढवणे चालते. पण शेतकऱ्याला त्याच्या मालाचा भाव वाढला की, मात्र देशाला महागाईची आठवण होते! ज्याच्या मालाच्या किमतीवर सर्वाधिक चर्चा होते, तोच देशातील सर्वाधिक कर्जबाजारी आणि आत्महत्या करणारा वर्ग आहे. मात्र त्यावर ना चर्चा, ना उपाययोजना! हा विरोधाभास नाही का? खरे तर महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यालाच बसतो. कारण तो महाग झालेल्या भावातच पेट्रोल, डिझेल, पाईप, सिमेंट, औषधे विकत घेतो. खते, कीटकनाशके विकत घेतो आणि सरकारने शाळा बंद केल्या तरी खासगी शाळेत आपल्या मुलांचे शिक्षणही करतो. पण त्याच्या उत्पादनाचा भाव जरा वाढला की त्यालाच दोषीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. महागाईची ही व्याख्या बदलण्याची वेळ आली आहे. महागाई म्हणजे फक्त गहू, तांदूळ, कांदा, डाळ, तेल किंवा साखर नव्हे. निर्यातबंदी, आयातमुक्ती आणि साठाबंदीच्या धोरणात्मक हस्तक्षेपांपासून सरकार दूर राहिले तरी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळू शकतो. महागाई म्हणजे सामान्य माणसाच्या जगण्याशी संबंधित प्रत्येक वस्तू आणि सेवेच्या किमतीतील वाढ. जोपर्यंत समाज 'शेतमाल स्वस्तच हवा' या मानसिकतेतून बाहेर पडत नाही, तोपर्यंत शेती संकटातच राहणार आणि शेतकरी अन्याय सहन करत आत्महत्या करत राहणार. देशाला स्वस्त अन्न हवे आहे, पण स्वस्त अन्न पिकवणारा माणूस मात्र कायम कर्जबाजारी, आत्महत्याग्रस्त आणि दरिद्री राहावा अशी अपेक्षा आहे. ही अर्थनीती नाही. हा समाजाने शेतकऱ्याविरुद्ध केलेला ऐतिहासिक अन्याय आहे. येथे लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे जगातील विकसित देशांमध्ये म्हणजे अमेरिका, युरोप, जपान, जर्मनी, कॅनडा, ब्राझील, चीन येथे तुम्हाला सर्वाधिक महाग जर काय मिळेल तर ते म्हणजे खाण्या-पिण्याचे पदार्थ. शेतकऱ्याला त्याच्या मालाचा भाव मिळणे हा प्रश्न महागाईचा नाही; तो न्यायाचा प्रश्न आहे. अनेक विकसित देशांमध्ये शेतकऱ्यांना थेट अनुदाने, संरक्षणात्मक आयात धोरणे आणि उत्पादनाला हमी देणारी व्यवस्था आहे. त्यामुळे शेती टिकाऊ राहते आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहते. देशात महागाईची व्याख्या बाजाराने ठरवलेली नाही. ती राजकारणाने ठरवलेली आहे. म्हणूनच उद्योगपतींचा नफा विकास आणि शेतकऱ्याचा भाव महागाई ठरतो. महागाईची व्याख्या बदलल्याशिवाय शेतकऱ्याचे भविष्य बदलणार नाही आणि शेतकऱ्याचे भविष्य बदलल्याशिवाय देशाचे भविष्य बदलणार नाही.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरण परिषदेत मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक लेस्टर ब्राऊन यांनी म्हटले आहे की, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी वंगारी मथाई यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी ५० कोटी वृक्ष लागवड




अभियान राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे.

याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मॅंग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.

जल, जमीन आणि जंगल ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते. जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत सीडबॉल घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे.मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.

आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

**प्रवीण टाके**
उपसंचालक
विभागीय कार्यालय,
कोल्हापूर/ ९७०२८५८७७७

# जागतिक पर्यावरण दिन : विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणारी व्यवस्था

५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व जनमानसात रुजविणे, निसर्गाविषयी संवेदनशीलता निर्माण करणे आणि पृथ्वीच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचा संदेश देणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे. मात्र दुर्दैवाने, आज पर्यावरण दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम, सोशल मीडियावरील पोस्ट, झाडे लावण्याचे फोटोसेशन आणि भाषणापुरता मर्यादित राहिलेला दिसतो. प्रत्यक्षात मात्र विकासाच्या नावाखाली जंगलांची कत्तल, नद्यांचे प्रदूषण, डोंगरांची तोड, हवेत वाढणारे विषारी घटक आणि शहरांच्या कॉंक्रीटीकरणामुळे पृथ्वीचा श्वासच गुदमरू लागला आहे. आज जग एका अभूतपूर्व पर्यावरणीय संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल, पाण्याची टंचाई, वाढते तापमान, असंतुलित पाऊस, चक्रीवादळे, महापुर, दुष्काळ आणि जैवविविधतेचा ऱ्हास ही केवळ वैज्ञानिक अहवालातील शब्दावली राहिलेली नाही, तर ती आता मानवी जीवनाला थेट ग्रासणारी वस्तुस्थिती बनली आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तर परिस्थिती अधिक गंभीर आहे. कारण येथे लोकसंख्या वाढ, अनियंत्रित शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे पर्यावरणीय समतोल धोक्यात आला आहे.

आज शहरांमध्ये रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली हजारो झाडे एका रात्रीत कापली जातात. प्रशासन म्हणते, विकासासाठी आवश्यक आहे. पण हा विकास नेमका कुणासाठी आणि कोणाच्या किंमतीवर? झाडे तोडून, नद्या बुजवून आणि डोंगर फोडून उभे राहणारे सिमेंटचे जंगल खरंच प्रगतीचे प्रतीक म्हणता येईल काय? विकासाचा अर्थ जर फक्त मॉल, उड्डाणपूल, टॉवर्स आणि कारखाने एवढाच उरला असेल, तर आपण भविष्यातील पिढ्यांसाठी मृत्यूचा वारसा तयार करत आहोत, हे स्पष्ट आहे. भारतातील अनेक शहरांची हवा आज धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. दिल्ली, मुंबई, पुणे,




नागपूर यांसारख्या शहरांमध्ये वाढते वाहनप्रदूषण, औद्योगिक धूर आणि धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. श्र्वसनाचे आजार, हृदयविकार, त्वचारोग आणि कर्करोगासारख्या रोगांमध्ये वाढ होत आहे. दुसरीकडे प्लास्टिक प्रदूषणाने नद्या, समुद्र आणि जमीन अक्षरशः गुदमरली आहे. प्लास्टिक बंदीचे कायदे फक्त कागदावर दिसतात, प्रत्यक्षात बाजारपेठेत सर्वत्र प्लास्टिकचा सुळसुळाट सुरूच आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत शासनाची भूमिका अनेकदा दुटप्पी दिसते. एका बाजूला वृक्षारोपण मोहिमा राबवल्या जातात, तर दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रकल्पांसाठी हजारो हेक्टर जंगल जमीन उद्योगपतींना दिली जाते. जंगल हे केवळ लाकूड किंवा जमीन नसून ते पृथ्वीचे फुफ्फुस आहेत, हे शासनाला समजत नाही का? पर्यावरणीय मंजुरी देताना अनेक नियम पायदळी तुडविले जातात. लोकांचा विरोध डावलून प्रकल्प रेटले जातात. पर्यावरण संरक्षणाच्या कायद्यांमध्येही अनेकदा उद्योगस्नेही बदल केले जातात. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, शासन खरोखर पर्यावरण वाचवू इच्छिते की केवळ विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीची विक्री करत आहे? आज नद्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, पंचगंगा, नाग नदी अशा अनेक नद्या औद्योगिक रसायने, सांडपाणी आणि प्लास्टिक कचऱ्यामुळे प्रदूषित झाल्या आहेत. नदी स्वच्छतेच्या नावाखाली हजारो कोटी रुपये खर्च होतात; पण प्रत्यक्षात नद्यांचे प्रदूषण कमी होताना दिसत नाही. कारण भ्रष्टाचार, नियोजनाचा अभाव आणि प्रशासनाची उदासीनता हेच या समस्येचे मूळ आहे.

पर्यावरणाचा प्रश्न्न हा केवळ झाडांचा किंवा नद्यांचा प्रश्न्न नाही; तो मानवी अस्तित्वाचा प्रश्न्न आहे. शेतकरी आज हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका सहन करत आहे. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ तर कधी गारपीट यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अन्नधान्य उत्पादनातील घट आणि वाढती आर्थिक अस्थिरता यामागे पर्यावरणीय असंतुलन हे एक महत्त्वाचे कारण आहे. पण दुर्दैवाने, पर्यावरणीय प्रश्न्नांना अजूनही दुय्यम महत्त्व दिले जाते. आजची सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे पर्यावरण संवर्धनाला 'इव्हेंट' बनवले गेले आहे. जागतिक पर्यावरण दिन आला की सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, राजकीय पक्ष आणि विविध संस्था झाडे लावण्याचे कार्यक्रम घेतात. फोटो काढले जातात, सोशल मीडियावर पोस्ट टाकल्या जातात आणि दुसऱ्या दिवशी ती रोपे वाळून जातात. पर्यावरण संवर्धन ही सातत्याने चालणारी जीवनशैली असायला हवी, ती केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहून चालणार नाही.

पर्यावरण वाचविण्यासाठी केवळ शासनावर टीका करून उपयोग नाही, प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारीही ओळखली पाहिजे. पाणी वाचविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे, झाडांचे संरक्षण करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण पृथ्वी ही केवळ आपली मालमत्ता नाही; ती पुढील पिढ्यांचीही आहे. शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे. मुलांना केवळ पुस्तकातील धडे शिकवून उपयोग नाही; तर त्यांना प्रत्यक्ष निसर्गाशी जोडणे गरजेचे आहे. वृक्षसंवर्धन, जलसंधारण, जैवविविधता आणि कचरा व्यवस्थापन याबाबत सामाजिक जाणीव निर्माण करावी लागेल. पर्यावरण संरक्षण हे केवळ सरकारी विभागाचे काम नसून समाजाच्या प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेतला पाहिजे.

माध्यमांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा मोठ्या उद्योगसमूहांच्या जाहिरातींच्या दबावामुळे पर्यावरणीय प्रश्न्नांना पुरेसे स्थान दिले जात नाही. वृक्षतोड, नदीप्रदूषण, खाणकामातील भ्रष्टाचार आणि पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन यावर सातत्याने आवाज उठविणे गरजेचे आहे. कारण स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारिताच समाजाला जागृत ठेवू शकते. आज गरज आहे ती पर्यावरणपूरक विकास मॉडेलची. विकास आणि पर्यावरण हे एकमेकांचे शत्रू नाहीत; पण विकासाचा मार्ग निसर्गाशी सुसंवादी असायला हवा. अक्षय ऊर्जा, जलसंधारण, शाश्र्वत शेती, हरित तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वाहतूक यांना प्राधान्य दिल्यास विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन साधता येऊ शकते. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, पारदर्शक प्रशासन आणि जागरूक नागरिकत्व आवश्यक आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आपण स्वतःला एक प्रश्न्न विचारला पाहिजे आपण पुढील पिढ्यांना नेमकी कोणती पृथ्वी देणार आहोत? हिरवीगार, स्वच्छ आणि जीवनदायी पृथ्वी की प्रदूषणाने ग्रासलेला, पाण्यासाठी संघर्ष करणारा आणि उष्णतेने होरपळणारा ग्रह? हा निर्णय आजच्या पिढीला घ्यावा लागणार आहे. निसर्गाशी युद्ध करून मानव कधीच जिंकू शकत नाही. कारण शेवटी निसर्ग आपला समतोल स्वतः निर्माण करतो, पण त्याची किंमत मानवजातीला चुकवावी लागते. कोरोना महामारीनेही आपल्याला हेच शिकवले की, निसर्गाचा अतिरेकाने ऱ्हास केल्यास त्याचे परिणाम किती भीषण असू शकतात.

पर्यावरण वाचविणे ही आता केवळ सामाजिक जबाबदारी राहिलेली नाही, तर ती अस्तित्वाची लढाई बनली आहे. त्यामुळे पर्यावरण दिन हा केवळ उत्सव न राहता तो आत्मपरीक्षणाचा दिवस व्हायला हवा. झाडे लावण्यापेक्षा झाडे जगविण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणाऱ्या धोरणांविरोधात समाजाने जागृतपणे आवाज उठवला पाहिजे. अन्यथा भविष्यातील इतिहास आपल्या पिढीची नोंद स्वतःच्या विकासाच्या हव्यासापायी पृथ्वी उद्ध्वस्त करणारी पिढी अशी करेल. आपणास व आपल्या परिवारास जागतिक पर्यावरण दिनाच्या हिरव्यागार शुभेच्छा!


चलाफक्त झाडे लावू नका, ती जगवण्याची जबाबदारीही स्वीकारूया

पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवूया

प्लास्टिकमुक्त आणि प्रदूषणमुक्त भारत घडवूया

निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे. भावी पिढ्यांसाठी हिरवीगार, स्वच्छ आणि सुरक्षित पृथ्वी निर्माण करण्याचा संकल्प करूया!

निसर्ग वाचला तरच मानवजातीचे अस्तित्व टिकेल.



**प्रविण बागडे**
नागपूर
९९२३६२०९१९

## विविध वृत्त...

### चर्चा बंडखोरीची पण शिंदेंनी भलत्याच जागी गेम फिरवला, निवडणुकीआधीच शिवसेनेने उधळला विजयाचा गुलाल

**ठाणे/प्रतिनिधी** : राज्याच्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठीचे अर्ज मागे घेण्याचा अवधी संपण्यास काही तासांचा अवधी शिल्लक आहे. काही ठिकाणी महायुतीमध्ये बंडखोरी शमण्यासाठीचे प्रयत्न सुरू आहेत. तर, दुसरीकडे विजयासाठीच्या मतांची आकडेमोड सुरू झाली आहे. अशातच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आपल्या पहिल्या जागेवर विजय मिळवला आहे. शिंदे गटाचे उमेदवार बिनविरोध निवडून येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ठाणे स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीतून अत्यंत धक्कादायक आणि मोठी राजकीय घडामोडी समोर आली आहे. महाविकास आघाडीचे (श%अ) उमेदवार अभिजीत पवार यांनी ऐन वेळी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे ही निवडणूक आता पूर्णपणे बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले असून, महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि शिवसेना (शिंदे गट) नेते रवींद्र फाटक यांच्या बिनविरोध निवडून येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच याबाबत अधिकृत घोषणा निवडणूक अधिकारी करणार आहेत.

ठाणे जिल्ह्यात महाविकास आघाडीला मिळालेला हा सर्वात मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. राजकीय वर्तुळात या घडामोडीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अत्यंत मोठी आणि मास्टरस्ट्रोक खेळी मानली जात आहे. ठाणे हा उपमुख्यमंत्री शिंदेंचा बालेकिल्ला असून, तिथे विरोधकांचा उमेदवार मैदानातून मागे घ्यायला लावणे ही महायुतीसाठी मोठी जमेची बाजू ठरली आहे. ठाणे विधान परिषद निवडणुकीच्या इतिहासात ही निवडणूक बिनविरोध होण्याची ही पहिलीच वेळ आहे. आजवर या मतदारसंघात नेहमीच अटीतटीची लढत पाहायला मिळाली आहे, मात्र अभिजीत पवारांच्या माघारीमुळे यावेळी इतिहास बदलला आहे.

रवींद्र फाटक आता थेट बिनविरोध आमदार म्हणून विधान परिषदेत जाणार आहेत. मतदान प्रक्रियेपूर्वीच मविआने टाकलेल्या या शस्त्रामुळे ठाण्यातील विरोधकांच्या गोटात मोठी शांतता पसरली आहे.

उमेदवारी मागे का घेतली?

ठाणे-पालघर विधान परिषद निवडणुकीत बहुजन विकास आघाडीकडे निर्णायक मतदान होते. भाजपने संख्याबळाच्या आधारे या जागेवर दावा केला होता. महाविकास आघाडीने ही निवडणूक गांभीर्याने घेतली नसल्याचा दावा सातत्याने सत्ताधारी बाकांवरून करण्यात येत होता. आता, अभिजीत पवार यांनी उमेदवारी मागे घेतल्याने चर्चांना उधाण आले. तर, दुसरीकडे अभिजीत पवार यांनी वैयक्तिक कारणास्तव उमेदवारी मागे घेतली असल्याचे सांगण्यात येत आहे.

### विधान परिषद निवडणुकीत मंत्री गिरीश महाजनांच्या मध्यस्थीनंतर गणेश गीते यांची माघार; बंधू गोपाळ लढण्यावर ठाम

**नाशिक/प्रतिनिधी** : विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात महायुतीसमोर निर्माण झालेला पेच संकटमोचक मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीनंतर सुटण्याच्या मार्गावर आहे. मंत्री महाजन यांच्या यशस्वी शिष्टाईनंतर भाजपाचे बंडखोर उमेदवार गणेश गीते यांनी आपली उमेदवारी मागे घेण्याची तयारी दर्शवली आहे. मुंबईत गेल्या २० तासांपासून सुरू असलेल्या खलबतांनंतर हा निर्णय झाला आहे. त्यामुळे शिवसेनेचे उमेदवार नरेंद्र दराडे यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. असे तरी महायुतीची चिंता पूर्णपणे मिटलेली नाही. गणेश गीतेंचे बंधू गोकुळ गीते अद्यापही निवडणूक लढवण्यावर ठाम आहे.

नाशिकमधील विधान परिषदेची जागा महायुतीतील शिवसेनेला सुटल्यानं असून तेथून नरेंद्र दराडे यांनी आपला अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र, दुसरीकडे महायुतीतीलच भाजपाचे स्थानिक नेते गणेश गीते यांनी बंडखोरी करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

ही बंडखोरी रोखण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून पडद्यामागे वेगाने चक्रे फिरत होती. बुधवारपासून गणेश गीते आणि गिरीश महाजन हे मुंबईत तळ ठोकून होते. मुंबईत गणेश गीते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही भेट घेतली. या वरिष्ठ पातळीवरील बैठकीनंतर भविष्यात गणेश गीते यांचे योग्य राजकीय पुनर्वसन करण्याचं आश्वासन महाजन यांनी दिले. त्यानंतर गणेश गीतेंनी अर्ज मागे घेण्यास संमती दिली आहे.

बंधू गोकुळ गीते यांची महायुतीला डोकेदुखी-मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीनंतर अखेर गणेश गीते यांनी माघार घेण्याची तयारी दर्शवली आहे.मात्र दुसरीकडे गणेश गीते यांचे बंधू गोकुळ गीते यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. एकीकडे मोठ्या भावाने माघार घेतली असली तरी धाकटे बंधू गोकुळ गीते यांनी घेतलेल्या पवित्रा महायुतीसाठी डोकेदुखी ठरू शकतो.

काय म्हणतात गोकुळ गीते- मी गेल्या अनेक महिन्यांपासून मतदारांच्या संपर्कात असून निवडणुकीची जय्यत तयारी केली आहे.मी कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही अशी ठाम भूमिका गोकुळ गीते यांनी घेतली आहे.यावर आता भाजपाचे गणेश गीते आपल्या बंधूंची समजूत कशी काढतात यावर महायुतीचे भवितव्य अवलंबून आहे. जर गोकुळ गीतेंनी माघार घेतली, तर महायुतीच्या अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्या विजयाचा मार्ग सुकर होईल आणि भाजपमधील बंडखोरी पूर्णपणे शमल्याचे सिद्ध होईल.

# केजच्या विकासाला नवी गती; नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व हारूणभाई इनामदार यांचे योगदान कौतुकास्पद





**केज/प्रतिनिधी** : केज शहराच्या विकासासाठी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व नगरपंचायतचे प्रभावी नेतृत्व करणारे ज्येष्ठ नेते हारूणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामे वेगाने सुरू आहेत. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज, सिमेंट काँक्रीट रस्ते, नाल्यासह इतर नागरी सुविधांच्या उभारणीत दोघांनीही महत्त्वाची भूमिका बजावल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस चालू असून पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी नवीन ६४ बोअरवेलची कामे जोमाने सुरू असून अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

तसेच स्वच्छ आणि सुंदर केज घडविण्यासाठी नियमित स्वच्छता मोहीम, नालेसफाई आणि रस्ते विकासाची कामेही हाती घेण्यात आली आहेत.

नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या प्रशासनिक नेतृत्वामुळे विकासकामांना गती मिळाली असून हारूणभाई इनामदार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. दोघांच्या समन्वयातून केज शहराचा सर्वांगीण विकास साधण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देत शहर अधिक विकसित, स्वच्छ व सुविधायुक्त करण्यासाठी हे नेतृत्व कार्यरत असून आगामी काळातही आणखी विकासकामे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील अनेक मुख्य रस्त्याची कामे मार्गी लागलेली आहेत त्याचबरोबर शिक्षक कॉलनी परिसरात उमरी रोड जवळ नमो उद्यानाचे लवकरच काम मार्गी लागणार असून शहरातील छोट्या मोठ्या व्यवसायिकांचा प्रश्न देखील लवकरच मार्गी लागेल अशी माहिती समोर येत आहे.

## माता रमाई अभ्यास केंद्रास डॉ. भीमराव य. आंबेडकर यांची सदिच्छा भेट



**नवी मुंबई (वाशी) :** अशोका बॅंकवेट हॉल, बुद्ध प्रतिष्ठान वाशी येथील माता रमाई अभ्यास केंद्रास : डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर (कार्याध्यक्ष भा.बौ.महासभा आणि समता सैनिक दल राष्ट्रीय अध्यक्ष), यांच्या प्रमुख उपस्थितीत मा. उत्तमराव खोब्रागडे () रिटायर्ड अधिकारी - ऑल इंडिया बॅकवर्ड क्लासेस एम्प्लॉईज फेडरेशन, यांचा ७५ वा शतकोत्तर अमृतउत्सव (अभिष्टचिंतन सोहळा) वाशी नवी मुंबई येथे साजरा करण्यात आला त्यावेळी मा. डॉ. अनंत हर्षवर्धन (अध्यक्ष) बुद्ध प्रतिष्ठान वाशी, यांनी उपस्थित राहून उत्तमराव खोब्रागडे यांना वाढदिवसाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी भारतीय बौद्ध महासभा बौद्धाचार्य तथा पत्रकार दैनिक महावृत्त : कल्याणराव हनवते आणि सह्याद्री दूरदर्शन पत्रकार : संजय झनके यांचे सध्याचे छायाचित्र.

## 'दिलखुलास' कार्यक्रमात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रा.डॉ. आसावरी जाधव यांची विशेष मुलाखत

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात 'जागतिक पर्यावरण दिनानिमित्त' विशेष भागाचे प्रसारण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. हा कार्यक्रम शनिवार ६ आणि सोमवार ८ जून रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरुन आणि 'न्यूज ऑन एआयआर' पवर प्रसारित केला जाणार आहे. ही मुलाखत कोल्हापूर विभागीय माहिती कार्यालयाच्या सहायक संचालक वृषाली पाटील यांनी घेतली आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे महत्व, वाढते वायू, जल व ध्वनी प्रदूषण, प्लास्टिक वापरामुळे होणाऱ्या प्रदूषणाचे दुष्परिणाम तसेच पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी या मुलाखतीच्या माध्यमातून डॉ. आसावरी जाधव यांनी मार्गदर्शन केले आहे. तसेच बदलत्या हवामानाचा शेती आणि दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम, जलसंधारण, वृक्षारोपण, जैवविविधता संवर्धन, विद्यार्थ्यांची भूमिका आणि पर्यावरण क्षेत्रातील करिअरच्या संधी याविषयीही त्या सविस्तर माहिती देणार आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी उद्योग क्षेत्र आणि सामान्य नागरिकांनी सामूहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता अधोरेखित करत पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करण्याचे आवाहन 'दिलखुलास' कार्यक्रमातून आसावरी जाधव यांनी केले आहे.

## नाशिक शहरातील तब्बल ३१९ हॉटेलचे फायर ऑडिट नाही; परवाने रद्द करण्याची काँग्रेसची मागणी

**नाशिक/प्रतिनिधी** : दिल्लीतील हॉटेलला आग लागून अनेक नागरिकांचा होरपळून मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यासह नाशिक शहरातील हॉटेलच्या फायर ऑडिटचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. नाशिक शहरात अनेक बार, हॉटेल्स, रुफ टॉप हे विना फायर ऑडिट सर्रास सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. शहरात सध्या स्थितीत असलेल्या ४३६ हॉटेल्स आणि लॉजिंगपैकी तब्बल ३१९ हॉटेल्समध्ये फायर ऑडिट केलं नसल्याचं समोर आलं आहे.

नाशिक शहरानं २५ लाख लोकसंख्येचा टप्पा ओलांडला आहे. असं असताना नाशिक शहराची सुरक्षा सध्या पूर्णपणे रामभरोसे असल्याचं चित्र आहे. कोणतीही मोठी दुर्घटना घडल्यास धावून जाणाऱ्या अग्निशामन दलाकडे बोट दाखवलं जातं. परंतु, या विभागाला सध्या अपुऱ्या मनुष्यबळाची समस्या भेडसावत आहे. विशेष म्हणजे रोजी कोटींची उलाढाल असणाऱ्या आणि हजारो ग्राहकांची वर्दळ असलेल्या हॉटेल्सवर कारवाई करण्यासाठी महानगरपालिकडे पुरेशी यंत्रणा नाही. वारंवार नोटिसा देऊनही फायर ऑडिटकडे पाठ फिरवणाऱ्या हॉटेल चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याऐवजी मनुष्य नसल्याचं कारण पुढे केलं जात आहे. ही नाशिककरांसाठी शोकांतिका आहे.

शहरातील हॉटेल्स चालकांना वर्षातून दोन वेळा फायर ऑडिट अहवाल महानगरपालिकेला सादर करणं अनिवार्य आहे. अनेक हॉटेल चालक या नियमाला केराची टोपी दाखवतात. त्यामुळे मोठ्या दुर्घटनेची शक्यता असूनही त्याकडे दुर्लक्ष केलं जातं.

नोटीसच्या निर्धारित मुदतीत संबंधितांनी फायर ऑडिट न केल्यास नियमाप्रमाणं इमारतीचा पाणी आणि वीज पुरवठा खंडित करणं आणि इमारती टाळे लावण्यासह ५० हजार रुपयांचा दंड आकारण्याची नियमात तरतूद आहे. कायद्यानं रुफ टॉप हॉटेल आणि बेसमेंटमधील हॉटेलला परवानगी नाही. तरी देखील शहरात १०० हून अधिक हॉटेल्स कसे सुरू आहेत, हा प्रश्न आहे. फायर ऑडिट न करणाऱ्या हॉटेल्सला पालिकेच्या अधिकाऱ्यांनी नोटीस दाखवून औपचारिकता दाखविली आहे.

## 'सिस्टमला झटका देणारा अधिकारी'

जर सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी 'मी तुकाराम मुंढे' ही मोहीम सुरू केली तर......

तुकाराम मुंढे हे नाव आज त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांच्या कार्य पद्धतीमुळे राज्यातील प्रत्येक घराघरात पोहोचले आहे. मुंढेंची ओळख आहे फाईल्स टेबलावर ठेवण्याऐवजी फील्डवर जाणं, नियमांची पायमल्ली न करणं आणि सर्वात महत्त्वाचं राजकीय दबावाला न झुकणं. मात्र हे शिवधनुष्य एकट्यानेच का उचलावे हा प्रश्न आजघडीला तरी अनुत्तरित आहे.

जी कामे एक अधिकारी करू शकतो तीच कामे इतर अधिकाऱ्यांना का वर्ज्य असतील. राज्यातील प्रत्येक अधिकाऱ्याने ठरवले तर फाईल्स वर्षानुवर्षे पडून राहणार नाहीत, ठेकेदारीतलं कमिशन सिस्टिम मोडेल, ग्राऊंड लेव्हलवर अधिकारी दिसायला लागतील. मुंढे नेहमीच राजकीय हस्तक्षेपाला उघड विरोध करतात. त्यामुळे सगळ्यांनी त्यांची भूमिका घेतली तर सुरुवातीला प्रचंड घर्षण होईल संघर्ष होईल, बदल्यांचे सुळसुळाट होतील पण १-२ वर्षांत राजकारणींना कळेल की हा अधिकारी विकला/वाकला जाणार नाही. मग काम करणाऱ्या अधिकाऱ्याला राजकीय संरक्षण मिळायला लागेल. सध्या "सगळे सारखेच" ही धारणा आहे. जर १०० पैकी ८० अधिकारी प्रामाणिकपणे काम करू लागले तर तक्रार निवारणाचा वेग वाढेल, भ्रष्टाचाराचा धोका कमी होईल, लोकांचा सिस्टमवरचा विश्वास परत येईल.



पण हे आपण समजतो किंवा अपेक्षा करतो तेवढं सोपं नाही. सगळ्यांची तशी मानसिक तयारी नसते. घर, कुटुंब, बदल्यांची भीती असते. काही अधिकारी खरंच नियमात काम करायचं सोडून फक्त प्रसिद्धी साठी करतील. सिस्टीम इतकी लवकर बदलत नाही. एकटा मुंढे झेलता येईल पण १०० मुंढे झेलणं सिस्टीमसाठी कठीण होईल. "मी तुकाराम मुंढे" ही मोहीम जर खऱ्या अर्थाने झाली तर महाराष्ट्राच्या प्रशासनात ५ वर्षात दिसणारा बदल होईल. पण त्यासाठी फक्त नारा पुरेसा नाही त्या नावामागची किंमत मोजायची तयारी लागते हे ही तितकेच खरे. मात्र एक सुजान नागरिक म्हणून एवढं स्वप्न तर पाहू शकतो. सध्याच्या तरुण / अधिकाऱ्यांमध्ये ही रिस्क घ्यायची हिंमत नक्कीच आहे.

जय हिंद

**सतीश तांदळे**

**माझं लातूर परिवार**

# कर्नाटकचे नवनियुक्त मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या शपथविधीला काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या खा. रजनीताई पाटील यांची उपस्थिती

**केज/प्रतिनिधी** : कर्नाटक राज्याच्या राजकीय पटलावर नुकत्याच झालेल्या ऐतिहासिक सत्ता बदलाच्या पार्श्वभूमीवर, बंगळुरू येथे पार पडला. भव्य शपथविधी सोहळ्याला देशभरातील प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. या सोहळ्यात काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या,हिमाचल प्रदेश च्या प्रभारी, माजी खासदार रजनीताई पाटील यांनी प्रामुख्याने उपस्थित राहून नवनियुक्त मुख्यमंत्री मा. श्री. डी. के. शिवकुमारजी यांचे विशेष अभिनंदन केले व त्यांना पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

कर्नाटकातील काँग्रेस पक्षाच्या दणदणीत विजयानंतर संपूर्ण देशाचे लक्ष या शपथविधी सोहळ्याकडे लागले होते. बंगळुरू येथील कान्तीरवा स्टेडियमवर अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात हा सोहळा पार पडला. या दिमाखदार सोहळ्याला काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेतृत्व, विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि देशभरातील दिग्गज नेते उपस्थित होते.



यात महाराष्ट्रातून काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या, हिमाचल प्रदेश च्या प्रभारी खा.पाटील यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. रजनीताई पाटील यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव शपथविधी सोहळा संपन्न झाल्यानंतर माजी खासदार रजनीताई पाटील यांनी नवनियुक्त मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पुष्पगुच्छ देऊन शिवकुमारजींचे अभिनंदन केले. "डी. के. शिवकुमार यांच्यासारख्या खंबीर, अभ्यासू आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी नाळ जोडलेल्या नेत्याच्या हाती कर्नाटकची धुरा आल्यामुळे राज्याचा विकास अधिक गतीने होईल. हा विजय सर्वसामान्य जनतेचा आणि काँग्रेसच्या विचारसरणीचा आहे," असा विश्वास पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

काँग्रेसचे सरचिटणीस तथा केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांचीही उपस्थिती या दिमाखदार सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी बीड जिल्ह्यातील केज मतदारसंघातूनही नेत्यांनी हजेरी लावली होती. केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांनीही या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहून नवनियुक्त मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचे अभिनंदन केले.

आदित्य पाटील यांनी रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री शिवकुमार यांची भेट घेऊन केज मतदारसंघ व महाराष्ट्रातील जनतेच्या वतीने त्यांना शुभेच्छा दिल्या.

कर्नाटकच्या या विजयामुळे देशभरातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये एक नवा उत्साह आणि ऊर्जा निर्माण झाली असून, आगामी काळात याचे सकारात्मक परिणाम संपूर्ण देशात पाहायला मिळतील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण कर्नाटकचे नवनियुक्त मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या शपथविधीला बीड जिल्ह्यातील प्रमुख नेतृत्वाने हजेरी लावल्यामुळे स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे या सोहळ्याच्या माध्यमातून काँग्रेसने दक्षिण भारतात आपली पाळेमुळे पुन्हा एकदा मजबूत केल्याचा संदेश संपूर्ण देशात गेला आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्रो. (डॉ.) दीपक चाटे यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रो. (डॉ.) दीपक चाटे यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्य कार्यालय, छत्रपती संभाजी नगर आणि जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्हा पर्यावरण समिती सदस्य म्हणून नुकतीच निवड करण्यात आली आहे. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रभावी अंमलबजावणी, विद्यार्थ्यांना पसंदीनुसार व कौशल्य आधारित शिक्षण उपलब्ध करून देणे या समितीवरही त्यांची निवड झाली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) सिद्राम डोंगरगे यांनी शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी डॉ. सदाशिव दंदे, प्रो. (डॉ.) संजय गवई, डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रो. (डॉ.) विजयकुमार सोनी, डॉ. एम. बी. स्वामी, डॉ. शितल येरुळे, डॉ. डी. आर. भुरे, प्रा. रमेश तडवी, डॉ. तेजश्री महाजन, ग्रंथपाल प्रा. प्रमोद सराफे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

प्रो. (डॉ.) दीपक चाटे यांनी सलग तीन शैक्षणिक वर्ष स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, एस. आर. टी. मुक्टा संघटनेचे सचिव म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. तसेच त्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील विविध परिषदामध्ये सहभाग नोंदवून संशोधन निबंध सादर केले आहे. तसेच विद्यापीठाच्या व इतर विविध समित्यावर ते सदस्य म्हणून सध्याही कार्यरत आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे आणि सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, मुख्य समन्वयक, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक,



शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोमनाथ ढगे यांची उपविभागीय दक्षता व नियंत्रण समिती, रेणापूर सदस्यपदी नियुक्ती

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले साहेब यांच्या सुचनेनुसार व नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टिस महाराष्ट्र राज्य सचिव वैभवजी गीते साहेब,यांच्या शिफारशीवरून अनेक वर्षे सामाजिक क्षेत्रात अहोरात्र कार्यात असलेले सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ दामोदर ढगे यांची अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ अंतर्गत, रेणापूर उपविभागी दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्यपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.



सोमनाथ ढगे यांच्या या नियुक्ती बद्दल त्यांचे नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टीजचे पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. दरम्यान सदर नियुक्तीमुळे सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची व निर्देशांची खडक काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी आमची समिती ठोस पावली उचलून अनुसूचित जाती जमातीवर होणाऱ्या आणि अत्याचाराला आळा बसवण्यास प्रयत्नशील राहील अशी प्रतिक्रिया कार्यकर्ते सोमनाथ ढगे यांनी व्यक्त केले आहे.

## पुण्यातल्या राष्ट्रवादीच्या उमेदवारासाठी कोटींची डील, रोहित पवारांनी थेट आकडाच सांगितला

**पुणे/प्रतिनिधी** : विधानपरिषद निवडणुकीवरुन पुण्यात राष्ट्रवादी पक्षात मोठा ड्रामा पाहायला मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुण्यात विधानपरिषदेची उमेदवारी संजय काकडे यांचा मुलगा विक्रम काकडेंना देण्यात आल्यानं पक्षात नाराजी पहायला मिळाली होती. दरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी मोठा आरोप केला आहे. पुण्यातल्या राष्ट्रवादीच्या उमेदवारासाठी ५० ते ६० कोटी रुपयांची डील झाली असा आरोप रोहित पवारांनी केल्यामुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. ते पुण्यात माध्यमांशी केला आहे.

रोहित पवार म्हणाले, पुण्यातल्या उमेदवारांना पैसे घेऊन उमेदवारी दिली असे आम्ही ऐकलं आहे. पुण्यात पैशाचा व्यवहार झाला आहे. अनेक ठिकाणी पैशाचे व्यवहार करण्यात आले आहेत. पुण्यात देखील आर्थिक व्यवहार झाला. लोकांकडून ऐकलं ५०-६० कोटी रुपये पुण्याच्या जागेसाठी देण्यात आले. पुण्यातल्या राष्ट्रवादीच्या उमेदवारासाठी ५० ते ६० कोटी रुपयांची डील झाली. आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की या जागेसाठी मोठी आर्थिक डील झाली आहे.पुण्यातल्या उमेदवारांना पैसे घेऊन उमेदवारी दिली असे आम्ही ऐकलं आहे. अनेक उमेदवार घाबरत आहेत म्हणून माघार घेत आहेत. उमेदवार आपण सगळीकडे उभे केले आहेत मात्र भाजप आणि महायुतीकडून पैशाचा मारा केला जात आहे. सोलापूरमध्ये देखील उमेदवाराला पैसे दिले गेले. सरकार घोडा बाजार करत आहे. गलिच्छ पातळीवर राजकारण करत आहेत. भाजप आणि मित्र पक्षांकडून करोड रुपये दिले जात आहे.

आम्हाला कळत आहे की राज्यात महायुतीने असे काही उमेदवार दिले आहेत त्यांच्याकडे खूप पैसे आहेत. अनेक बाहेरून आलेल्या लोकांना उमेदवारी दिली गेली आहे. पुणे जागेची चर्चा जास्त होत आहे या ठिकाणी ६० ते ७० कोटी रुपये घेऊन उमेदवारी दिली अशी चर्चा आहे. व्यवहारीक व्यक्तीला उमेदवारी दिली गेली. या माणसाने अजित पवारांवर खालच्या पातळीवर जाऊन बोललं होता, हे सगळे भयानक आहे. आमचे प्रामाणिक कार्यकर्ते लढायला इच्छुक आहेत.

संजय काकडे आणि अनिल भोसलेंबरोबर अजित पवारांच मोठा वाद झाला होता. त्यांच्याच मुलाला आमदारकी देण्यात आल्याने पक्षातील पदाधिकारी नाराज असल्याची चर्चा होती. राष्ट्रवादी काँग्रेसची पुणे महापालिकेतील सत्ता २०१७ साली भाजपच्या पारड्यात जाण्यामध्ये संजय काकडे यांचा मोठा वाटा होता. त्यावेळी भाजपमध्ये असलेल्या संजय काकडेंनी राष्ट्रवादीचे अनेक नगरसेवक फोडून भाजपच्या गळाला लावले. जे राष्ट्रवादीचे नगरसेवक भाजपात गेले नाहीत त्यांचा साम, दाम, दंड, भेद वापरुन काकडेंनी पराभव घडवून आणला.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत ४ जून, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १८ जून, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## दिव्यांग संस्थांना मोठा दिलासा; ५८ संस्थांना त्रुटी पूर्ततेची संधी

### ७४ उपक्रमांना १०० टक्के वेतन अनुदानासाठी अंतिम मुदत

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत विशेष शाळा आणि पुनर्वसन संस्थांना शासनाने मोठा दिलासा दिला असून विविध अनुदान योजनांअंतर्गत अपात्र ठरलेल्या संस्थांना त्रुटी पूर्ततेची अंतिम संधी देण्यात आली आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाने यासंदर्भात स्वतंत्र आदेश जारी करून संबंधित संस्थांकडून आवश्यक कागदपत्रे निश्चित मुदतीत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

शासन निर्णय १६ जुलै २०२४ अन्वये अनुदान तत्त्वावर मान्यता मिळविण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची राज्यस्तरीय तपासणी समितीने छाननी केली होती. त्यामध्ये निर्धारित मुदतीत प्राप्त ५२ प्रस्ताव आणि मुदतीनंतर प्राप्त ६ प्रस्ताव अशा एकूण ५८ उपक्रमांचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आले होते. मात्र, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत संबंधित संस्थांना त्रुटी दूर करण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला.




संबंधित संस्थांना पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे आणि माहिती ई-मेलद्वारे शासनाकडे सादर करावी लागणार आहे. या यादीमध्ये मतिमंद, मूकबधिर, अंध, बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत निवासी व विशेष शाळांचा समावेश असून काही अनुदानित संस्थांमधील वाढीव विद्यार्थी संख्येला मान्यता देण्यासंबंधीचे प्रस्तावही आहेत.

राज्यातील १२१ विशेष उपक्रमांना ५० टक्क्यांवरून १०० टक्के वेतन अनुदान देण्याच्या प्रक्रियेलाही वेग देण्यात आला आहे. ६ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५० टक्के वेतन अनुदानावर मान्यता प्राप्त झालेल्या १२१ विशेष उपक्रमांपैकी अनेक संस्थांनी १०० टक्के वेतन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. आतापर्यंत ७४ उपक्रमांचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असून त्यामधील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित संस्थांना अंतिम संधी देण्यात आली आहे.

विभागाने स्पष्ट केले आहे की, राज्यस्तरीय छाननी समितीने अपात्र ठरविलेल्या ६८ उपक्रमांसह मुदतीनंतर प्रस्ताव सादर केलेल्या ६ उपक्रमांचा समावेश असलेल्या एकूण ७४ संस्थांनी आवश्यक पूर्तता करावी. या संस्थांना १५ दिवसांच्या आत आवश्यक माहिती आणि कागदपत्रे शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय, अद्याप प्रस्ताव सादर न केलेल्या उर्वरित ४७ उपक्रमांना १० दिवसांच्या आत प्रस्ताव सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संबंधित संस्था बंद असल्याचे किंवा अनुदान धोरणातील निकषांची पूर्तता करण्यात अपयशी ठरल्याचे गृहीत धरून त्यांना १०० टक्के वेतन अनुदानासाठी अपात्र ठरविण्यात येणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

त्रुटी पूर्ततेसाठी संस्थांना वैध नोंदणी प्रमाणपत्र, जिल्हा मूल्यांकन समिती व छाननी समिती अहवाल, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थितीचे बायोमेट्रिक अहवाल, यूडीआयडी व आधार नोंदणीची माहिती, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, संस्थेची घटना, विश्वस्तांची यादी तसेच आरक्षण धोरणाचे पालन केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, पात्र संस्थांना शासनाच्या अनुदानाचा लाभ मिळवून देणे आणि विशेष शाळांच्या कामकाजाला आर्थिक स्थैर्य प्रदान करणे हा या संपूर्ण प्रक्रियेमागील उद्देश असल्याचे दिव्यांग सक्षमीकरण विभागाने स्पष्ट केले आहे. सर्व प्रस्तावांची छाननी पूर्ण झाल्यानंतर पात्र प्रकरणे वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहेत.

## पाणी टंचाईनिवारनार्थ उपाययोजनांना प्राधान्य द्या - मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदा पाऊस कमी पडण्याची शक्यता लक्षात घेता पाणी टंचाई निवारणाच्या उपाययोजनांना प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे. १५ ऑगस्ट पर्यंतच्या पाणी वितरणाचे चोख नियोजन करावे तसेच, राज्यातील एकही पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही यासाठी गतीने ई-केवायसी तसेच ग्रीस्टॅक डाटा अपडेट करावा. राज्याचे पुनर्वसन धोरण सर्वसमावेशक व काळानुरूप करण्यासाठी नवे सुधारित धोरण जलदगतीने तयार करण्यात येईल,अशी ग्वाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आज येथे दिली.

मंत्रालयातील दालनात आयोजित मदत व पुनर्वसन विभागाच्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांच्यासह व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी उपस्थित होते.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले की, खरीप हंगाम २०२५-२०२६ मधील अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा 'ग्रीस्टॅक' डेटा सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तपासावा. ज्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळालेली नाही, त्यांच्यासाठी विशेष कॅम्प (शिबिरे) आयोजित करून तातडीने मदत वितरित करावी. शेतकरी आत्महत्या प्रकरणांमधील प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करून ही प्रकरणे प्राधान्याने आणि तात्काळ निकाली काढसवीत. यंदा पावसाचे कमी प्रमाण पाहता सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ ऑगस्टपर्यंतच्या पाणी वितरणाचे चोख नियोजन करावे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित कराव्यात. तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्र्वासात घेऊन आवश्यकतेनुसार चारा छावण्यांचे प्रस्ताव सादर करावेत. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील म्हणाले की, आपत्तीच्या काळात मनुष्यहानी, जखमी व्यक्ती, पशुहानी, घरगुती सामान (भांडी-कपडे), तसेच लहान दुकानदार व टपरीधारक यांना मिळणारी मदत स्थानिक प्रशासनाने शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विहीत कालावधीत करावी. दरडप्रवण गावांचे पुनर्वसन, १९७६ पूर्वीच्या प्रकल्पांमधील पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवणे आणि पूरग्रस्त भागातील गावांचे स्थलांतर यावर नवीन सुधारित धोरण लवकरच आणले जाईल. १४ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयातील निकषांमध्ये बदल करून, रहिवाशांना देण्यात येणाऱ्या जागेत वाढ करणे, घरकुल अनुदानाच्या रक्कमेत भरघोस वाढ करणे आणि पुनर्वसन वसाहतींमध्ये आधुनिक सोयी-सुविधांचा समावेश करणे या बाबींचा या नव्या धोरणात प्रामुख्याने समावेश असेल. नवीन धोरण आणल्यानंतर पुनर्वसनाचे प्रस्ताव लोकप्रतिनिधींना विचारात घेऊन सुधारित सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

## केरळमध्ये मान्सूनचे अधिकृत आगमन; मुंबईतही लवकरच दमदार पावसाची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी** :देशवासीयांसाठी दिलासादायक बातमी म्हणजे नैऋत्य मान्सूनचे गुरुवारी केरळमध्ये अधिकृत आगमन झाले आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा मान्सून साधारण तीन दिवस उशिराने केरळमध्ये दाखल झाला. दरवर्षी साधारणपणे १ जून रोजी मान्सून केरळमध्ये पोहोचतो आणि त्यानंतर देशभरातील चार महिन्यांच्या पावसाळ्याची सुरुवात होते.



हवामान विभागाने केरळमध्ये पुढील काही दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. केरळनंतर मान्सूनची वाटचाल आता उत्तरेकडे सुरू होणार असून, येत्या काही दिवसांत तो महाराष्ट्रासह देशाच्या इतर भागांमध्येही पोहोचण्याची शक्यता आहे.

प्रादेशिक हवामान केंद्राच्या अंदाजानुसार मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत ७ जूनपर्यंत अंशतः ढगाळ वातावरण राहू शकते. तसेच मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

दरम्यान, ७ जूनपर्यंत देशातील अनेक राज्यांमध्ये पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटाचा इशारा देण्यात आला आहे. कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड तसेच ओडिशा, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये व्यापक पावसाचा अंदाज आहे. काही भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसासह ताशी ६० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाच्या या अंदाजामुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुंबईसह कोकण किनारपट्टीकडे आता सर्वांचे लक्ष लागले असून मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा सुरू आहे.

## समता फाऊंडेशनच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** : समता फाऊंडेशन, लातूर ही संस्था गेल्या दोन वर्षांपासून समाजातील शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या घटकांसाठी सातत्याने कार्यरत आहे. वीटभट्टी कामगारांची मुले, ऊसतोड कामगारांची मुले तसेच कौटुंबिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून दूर जाणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संस्था करत आहे.

समता फाऊंडेशनच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त गुरुवार, दि. ४ जून २०२६ रोजी विविध सामाजिक उपक्रमांसह रक्तदान शिबिराचे आयोजन संजीवनी ब्लड सेंटर येथे करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः रक्तदान करून समाजापुढे आदर्श निर्माण केला.

यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रशांत राजश्री प्रभाकर सुरवसे, सचिव अमोल गवळी तसेच मंथन राठोड, अजिंक्य आष्टे, मानसी साबळे, दत्ता धुमाळ, राहेल शिरसाठ आणि विजय सुरवसे यांनी रक्तदान करून वर्धापन दिनाची शोभा वाढवली.

समाजातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भविष्यातही विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. समता फाऊंडेशनच्या या सामाजिक उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.



हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.